तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१. श्री. सतेज महादेव दणाणे
मु.लोंढे-मोहितेवाडी, ता.माळशिरस,
जि.सोलापूर.

२. श्री.संदेश सोपानराव बिचुकले
रा.स्वामी विवेकानंदनगर, प्लॉट नं.३०,
फलटण, जि.सातारा

तक्रार क्रं.२४/२०२५

तक्रारदार

तक्रार क्रं.२५/२०२५

विरूध्द्

१. श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण
जि.सातारा
२. नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण
जि.सातारा

वि. प

श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण, जि.सातारा या शिक्षण संस्थेचे नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण यांचेकडील शिक्षक श्री. सतेज महादेव दणाणे व श्री.संदेश सोपानराव बिचुकले यांनी दि.१५/१२/२०२५ रोजी तक्रार निवारण समितीकडे स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केले आहेत. दोन्हीं तक्रार अर्जांमध्ये मांडण्यात आलेला तक्रारीचा विषय तसेच उपस्थित केलेले मुद्दे समान स्वरूपाचे असल्याने या दोन्हीं तक्रार अर्जांवर एकत्रितपणे विचार करून या समितीमार्फत एकत्रित निकाल देण्यात येत आहे.

तक्रारीचे स्वरूपः

तक्रारदार श्री. सतेज महादेव दणाणे व श्री. संदेश सोपानराव बिचुकले हे जाबदार श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण संचलित नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण येथे अनुक्रमे मराठी व हिंदी विषयाचे पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक म्हणून दि.०३/०३/२०१४ पासून नियमित सेवेत कार्यरत आहेत.

तक्रारदारांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाचे प्राचार्य व व्यवस्थापनाकडे त्यांच्या सेवापुस्तकाच्या प्रत्येक वर्षाच्या नोंदींसह अद्ययावत प्रतीची मागणी केली. तथापि, आजपर्यंत

त्यांना अद्ययावत सेवा पुस्तिकेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. तसेच विद्यापीठ नियुक्त निरंतर संलग्नीकरण समितीच्या दि.१६/०३/२०२१ रोजीच्या भेटीदरम्यानही सेवा पुस्तके नंतर सादर करण्यात येतील, असे सांगण्यात आले. मात्र प्रत्यक्षात ती सादर करण्यात आली नाहीत. सातारा जिल्हा सुटा समितीच्या दि.०६/०४/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत दि.१५/०६/२०२५ पर्यंत सेवा पुस्तिकेच्या अद्ययावत प्रती संबंधित शिक्षकांना देण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि, वारंवार पाठपुरावा व पत्रव्यवहार करूनही त्यांना अद्ययावत सेवा पुस्तिकेच्या प्रती प्राप्त झालेल्या नसल्याने सदर तक्रारी समितीकडे दाखल करण्यात आल्या आहेत.

संस्था व महाविद्यालयाचे म्हणणे-

प्रस्तुत तक्रारींच्या अनुषंगाने परिनियम क्र. ३२८ नुसार तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाच्या प्रती समितीकडे सादर करणेबाबत संस्था व महाविद्यालयास वारंवार कळविण्यात आले होते. त्यासाठी जाबदार संस्था व महाविद्यालय यांना वेळोवळी पत्रे व स्मरणपत्रे देण्यात आली होती. तसेच सुनावणीदरम्यानही लेखी म्हणणे सादर करण्याबाबतही समितीकडून निर्देश देण्यात आले होते. तथापि, संस्था व महाविद्यालयाने तक्रारीच्या गुणदोषांवर कोणतेही लेखी म्हणणे अथवा अभिप्राय समितीसमोर सादर केलेला नाही.

सुनावणीदरम्यान महाविद्यालयाच्या वतीने जा.क्रं.१३९/२०२६-२०२७ दि.१३/०७/२०२६ रोजीच्या पत्राने एवढेच नमूद करण्यात आले की, विनाअनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचा-यांची सेवा पुस्तके तयार करण्यासंदर्भात काही अडचणी असून, विद्यापीठाकडे मार्गदर्शन मागितले असून मार्गदर्शन अथवा प्रशिक्षण मिळाल्यानंतर याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

समितीची निरीक्षणे:

प्रस्तुत प्रकरणी समितीने दोन्ही तक्रारदारांचे अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे तसेच शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ४२ (१) अंतर्गत तयार करण्यात आलेले परिनियम यांचा सखोल विचार केला आहे.

समितीच्या प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, जाबदार संस्था व महाविद्यालयास तक्रारीवरील आपले म्हणणे सादर करण्यासाठी समितीकडून पुरेशी व वाजवी संधी देऊनही कोणतेही

लेखी स्पष्टीकरण सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे तक्रारदारांनी मांडलेल्या तक्रारीचे प्रभावी खंडन करण्यात जाबदार संस्था व महाविद्यालय हे अपयशी ठरले आहेत.

जाबदार महाविद्यालयाने सेवा पुस्तके अद्ययावत करण्यासाठी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याचे कारण नमूद केले आहे. तथापि, असे कारण या समितीस ग्राह्य धरता येत नाही. कारण सेवा पुस्तिका ठेवणे, त्यामधील नोंदी अद्ययावत ठेवणे व त्याची प्रमाणित प्रत संबंधित शिक्षकास उपलब्ध करून देणे ही व्यवस्थापनाची वैधानिक जबाबदारी आहे. या जबाबदारीच्या पूर्ततेसाठी स्वतंत्र मार्गदर्शन अथवा प्रशिक्षणाची प्रतीक्षा करणे हा कायदेशीर आधार ठरू शकत नाही.

शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ४२(१) अंतर्गत तयार करण्यात आलेले परिनियम क्रं.२०८ मधील तरतूद खालील प्रमाणे-

S.208 : Service Book:

A Service Book shall be maintained by the Principal of the College/ Head of the Recognised Institution for each teacher of the affiliated college/ Recognised Institution and shall contain information regarding date of birth, date of appointment, total service under different managements and date of joining, scale of pay, increments, probation and particulars of leave.

A copy of the Service Book shall be given to every teacher by the Management and the teacher will be entitled to have the entries in his service Book certified by the Principal.

सदर तरतूदीमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, प्रत्येक संलग्न महाविद्यालय अथवा मान्यताप्राप्त संस्थेतील प्रत्येक शिक्षकासाठी सेवा पुस्तिका ठेवणे बंधनकारक असून, त्यामध्ये जन्मतारीख, नियुक्तीची तारीख, सेवेचा तपशील, वेतनश्रेणी, वेतनवाढ, परिविक्षाधीन कालावधी, रजेचा तपशील इत्यादी बाबींची नोंद असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक शिक्षकास त्याच्या सेवा पुस्तिकेची प्रत व्यवस्थापनामार्फत देणे आणि त्यातील नोंदी प्राचार्यामार्फत प्रमाणित करून घेण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, सेवा पुस्तिका तयार करून तिची अद्ययावत प्रत संबंधित शिक्षकास उपलब्ध करून देणे ही व्यवस्थापनाची कायदेशीर व वैधानिक जबाबदारी आहे. प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार यांनी वेळोवेळी जाबदार संस्था व महाविद्यालयाकडे याबाबत लेखी मागणी केलेली

असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते. परंतू जाबदार संस्था व महाविद्यालय यांनी ही जबाबदारी पार पाडलेली नसल्याचे समितीच्या निर्दशनास येते.

सबब, समिती या निष्कर्षास येते की, दोन्ही तक्रारदारांची मागणी ही पूर्णपणे वैधानिक अधिकारावर आधारित असून ती न्याय्य, रास्त आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून, परिनियम क्रं.२०८ च्या अनुषंगाने तक्रार निवारण समिती खालील आदेश पारित करत आहे.

आदेश

जाबदार श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटण व नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण यांनी तक्रारदार श्री. सतेज महादेव दणाणे व श्री. संदेश सोपानराव बिचुकले यांची सेवा पुस्तके नियमानुसार संपूर्णपणे अद्ययावत करून त्याच्या प्रमाणित प्रती हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक (०१) महिन्याच्या आत संबंधित तक्रारदारांना उपलब्ध करून द्याव्यात.

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

दिनांक : 2 0 AUG 2026

छत्रपती शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)